ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १६ डिसेंबर, १९७० | अंक १३

## छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा




सुमारे ३०० हून अधिक रस्ता-वाहतूक व्यावसायिकांना बँकेचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.

सुमारे एका कोटीच्या घरात!

**तुमच्याही छोट्या-मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.**

तपशीलासाठी आजच चौकशी करा.

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

6987

## सुशिक्षितांच्या बेकारीचे गंभीर स्वरूप

सुशिक्षित बेकारांच्या संख्येचा विश्वासार्ह आकडा देणे कठीण आहे. पण, तीन पंचवार्षिक कार्यक्रम पार पडल्यानंतरही त्यांची संख्या वाढत आहे, ह्याबद्दल दुमत आढळत नाही. भारतात बेकारीचा प्रश्न १९२९ च्या मंदीपासून आहेच पण त्या वेळच्या बेकारांना ती सह्य होण्यासारखी परिस्थिती थोडीबहुत होती. एक तर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सध्याच्या मानाने अत्यल्प होत्या. शिवाय राहणीचे मानही बेताचे होते. आता मात्र जगण्याची किंमत मोठी आणि अपेक्षांची उंचीही मोठी; परिणामी बेकारांच्या असंतोषाची धग जाचकच नव्हे तर स्फोटक होऊ लागली आहे. सर्वसामान्यपणे बेकारी वाढत आहे हे मानले तरी त्याची थोडीबहुत तपशीलवार माहिती ही विषण्णता अधिकच गडद करणारी ठरते. ह्या बाबतीत नोकरीच्या जाहिराती आणि त्यांच्यापोटी आलेले अर्ज विदारक प्रकाश टाकतात. काही दिवसांपूर्वी एका प्रसिद्ध औषधाच्या कंपनीने १७ जागा भरावयाच्या असल्याची जाहिरात दिली होती. ह्या जागांसाठी ३६ हजार अर्ज आले. मुंबईमधील एका एंजिनिअरिंग कंपनीनेही नोकरीसाठी जाहिरात दिली होती. ही कंपनी दरसाल ६० एंजिनिअरांना नोकऱ्या देत असते. कंपनीने दिलेल्या जाहिरातीपोटी १० हजार इंजिनिअरांचे अर्ज आले. अशा परिस्थितीत लायक उमेदवाराच्या निवडीचे काम अतिशय कठीण होते. ह्यावर उपाय म्हणून कंपनीने अर्जदारांची लायकी ठरविण्यासाठी गणकयंत्राचा वापर करण्याचा निर्णय अनिच्छेने घेतला. बेकारांच्या तांड्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखणे अवघड होते हे कलकत्त्यामधील रोजच्या घटनांवरून दिसतच आहे. नोंदलेल्या बेकारांच्या संख्येपेक्षा एकूण बेकारांची संख्या तिपटीने तरी अधिक असावी असा अंदाज आहे.

---

## सत्ताभ्रष्ट पुढारी आणि निवडणुकांचे मैदान

१९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धाच्या वेळी मि. भुत्तो हे परराष्ट्रमंत्री म्हणून पाकिस्तानच्या सरकारात होते, नंतर ते स्थानभ्रष्ट झाले आणि राजकारणाच्या रणांगणात उतरले. पाकिस्तानातील निवडणुकीच्या प्रसंगाने त्यांच्यावर प्रखर टीका करण्यात आली. पाकिस्तानातील संपत्तीवर २२ घराण्यांची मगरमिठी आहे असा समज पाकिस्तानात पसरलेला आहे. पाकिस्तानचे माजी वायुदल प्रमुख मि. अझगरखान खान ह्यांनी असा जाहीर आरोप केला आहे की पाकिस्तानातील संपत्तीचे केंद्रीकरण होण्यास मि. भुत्तोच जबाबदार आहेत. ते म्हणतात की मि. भुत्तो हे उद्योगखात्याचे मंत्री असताना त्यांनी आयातीचे बेलगाम परवाने दिले आणि औद्योगिक मक्तेदारी निर्माण करण्यासही मदत केली. मि. भुत्तो हे प्रथमपासूनच भ्याड, हांजीहांजीखोर व संधिसाधू जीवन जगले आहेत.

---

## उत्तर प्रदेश सरकारला डॉक्टरांची वाण

म्हैसूर राज्यात डॉक्टरांना नोकरी मिळणे कठीण होत चालले आहे. राज्य सरकारच्या आरोग्य खात्यात ४५ डॉक्टरांची भरती करण्यासाठी पब्लिक सर्व्हिस कमिशनने अर्ज मागविले असता ह्या जागांसाठी ५५० अर्ज आले. राज्यात दर साल १,२०० नवे डॉक्टर्स शिकून बाहेर पडतात. त्यांपैकी बहुतेकजण सरकारी नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु पुरुष डॉक्टरांच्या जागा रिकाम्या नाहीत असे राज्य सरकारने जाहीर केले आहे. उलट, स्त्री डॉक्टरांची मात्र काही प्रमाणात चणचण भासत आहे. पुरुष डॉक्टरांमधील बेकारी अंशतः दूर करण्यासाठी राज्य सरकारने २६५ प्राथमिक आरोग्य केंद्रांतून त्यांना नेमले आहे. वास्तविक ह्या केंद्रातील जागा स्त्री डॉक्टरांसाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या. म्हैसूर राज्यातील ह्या परिस्थितीकडे उत्तर प्रदेश सरकारचे लक्ष गेलेले दिसते. तेथे अधिक डॉक्टरांची जरुरी आहे. म्हैसूर राज्यातील डॉक्टर्स भरती करण्याची एक योजनाच उत्तर प्रदेश सरकारने त्या राज्याकडे पाठविली आहे. उत्तर प्रदेश सरकारला ४०० पुरुष डॉक्टरांची ताबडतोब गरज आहे. त्याशिवाय ३० स्त्री डॉक्टरही पाहिजे आहेत. उत्तर प्रदेश सरकारच्या सार्वजनिक आरोग्य खात्यात आणखी १५० जागा भरावयाच्या आहेत. म्हैसूर राज्यातील डॉक्टरांना आकर्षित करण्यासाठी दरमहा ३५० पासून १,२५० रु. पर्यंत पगार देण्याची तयारी दाखविण्यात आली आहे. त्याशिवाय राहण्याची विनाभाडे जागा आणि खाजगी व्यवसाय न करण्याबद्दल नुकसानभरपाई म्हणून भत्ताही देऊ करण्यांत आला आहे.

---

## महारोग्यांसाठी अपुरी इस्पितळे

हिंदमधील महारोगाने पछाडलेल्या रोग्यांची संख्या जवळ जवळ २५ लाख इतकी मोठी आहे. रोग्यांची शुश्रूषा करून त्यांच्यावर उपाय करणारी २१९ इस्पितळे देशात आहेत. पण त्यांतून फक्त २७,४३८ रोग्यांचीच सोय होऊ शकते. ही संख्या रोग्यांच्या संख्येच्या अवघी एकदशांश आहे. महारोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी अमलात असलेल्या राष्ट्रीय योजनेखाली ८ लाख, ८० हजार रोग्यांची नोंद करण्यात आली असून त्यांना घरीच उपचार करण्याची सोय करण्यात आली आहे. सव राज्यांत महाराष्ट्र राज्यामध्ये महारोग्यांसाठी सर्वात ज्यास्ती म्हणजे २७ इस्पितळे असून त्यांतील खाटांची संख्या ४,१२५ आहे. तामीळनाडूमध्ये २६ इस्पितळे आहेत व खाटांची संख्या ३,२२२ आहे. आंध्र प्रदेश व उत्तर प्रदेश ह्या राज्यांतून प्रत्येकी २२ इस्पितळे आहेत.

---

**२३ कोटी रु. ची यंत्रसामग्री पडून आहे**—निरनिराळ्या पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा प्रकल्पांत सुट्या भागांच्या अभावी २३ कोटी रु. ची यंत्रसामग्री धूळ खात पडली आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १६ डिसेंबर, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## आयुर्विमा व्यवसायाची शतसंवत्सरी

आयुर्विमा व्यवसायाची शतसंवत्सरी देशभर नुकतीच साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने ह्या व्यवसायाने बजावलेली कामगिरी आणि त्याचा भविष्यकाळ ह्या संबंधी अनेकविध विचार प्रकट करण्यात आले. ह्या व्यवसायाकडे मुख्यत: अनेक दृष्टींनी पाहावे लागते. आयुष्यातील अनिश्चिततेपासून संरक्षण करण्याचा एक उपाय म्हणूनच विमेदार त्याचा विचार करतात. म्हणून विमेदारांच्या दृष्टीने विम्याचे हप्ते परवडण्याइतके अल्प असण्यास साहजिकच महत्त्व आहे. आयुर्विम्याचे सध्याचे हप्ते अल्प म्हणता येणार नाहीत. हप्ते भारी असल्यामुळे विमेदारांचेच फक्त नुकसान होते असे नाही. विम्याच्या व्यवसायाचे क्षेत्र वाढत जाण्यासही त्याचा प्रतिबंध होतो. गेल्या काही वर्षांत भारतामधील मृत्यूचे प्रमाण कमी होत असून आयुष्याची अपेक्षाही वाढलेली आहे. अर्थातच विमा कॉर्पोरेशनला अनपेक्षित मृत्यूपायी द्याव्या लागणाऱ्या हक्कांची पूर्तीही कमी प्रमाणात करावी लागत आहे. विम्याचे हप्ते कमी करण्यासाठी हे एक सबळ कारण दाखविता येईल. दुसऱ्या एका दृष्टीने विमेदारांचे नुकसान होत आहे. रुपयाची किंमत घसरल्यामुळे पॉलिसीची दर्शनी किंमत तेवढीच राहून व्यवहारात मात्र तिची किंमत कमी झालेली आहे. म्हणजे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी उतरलेल्या विमा पॉलिसीची खरी किंमत विम्यापेक्षाही अधिक घटलेली आहे. उलटपक्षी, विमाव्यवसायात काम करणाऱ्या नोकरांचे वेतन मात्र खूपच वाढलेले आहे. अशा परिस्थितीत विमा उतरण्यासाठी नागरिकांना अधिक प्रलोभने असणे आवश्यक झाले आहे.

तथापि, आयुर्विमा ही संस्था लोकांकडील शिल्लक पैसा जमविण्याचे कामही करीत असते. भारतासारख्या अविकसित देशात तर देशांतर्गत साधनसंपत्ती जमविण्याच्या कामी आयुर्विमा व्यवसायाला मोठी कामगिरी करता येण्यासारखी आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी पैसा उपलब्ध करून देतानाच विमापत्रकाद्वारे कुटुंबांना सुरक्षितता देण्याचे कामही आयुर्विम्याच्या द्वारे होत असते. भारतात सामाजिक सुरक्षिततेची योजना अमलात आणणे द्रव्याचे अभावी शक्य झालेले नाही. म्हणून ह्या व्यवसायाच्या कामाचे मूल्यमापन करताना नव्या धंद्याच्या आकड्यापेक्षाही किती कुटुंबे विम्याच्या सरक्षणाच्या कक्षेत आली त्याला अधिक महत्त्व आहे. ह्या बाबतीत आयुर्विमा कॉर्पोरेशनने काही प्रगती केल्याचे दिसते. कॉर्पोरेशनने दिलेल्या एकूण विमापत्रकांपैकी ३० टक्के विमापत्रके ग्रामीण भागांतील लोकांना दिलेली आहेत. आणि ७० टक्के पत्रके मध्यम व कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांना दिलेली आहेत. आयुर्विमा व्यवसायाने १,००० कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविण्याचे उद्दिष्ट गाठले आहे. येत्या पाच वर्षांत दरसाल २,००० कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. हे गाठण्यासाठी कॉर्पोरेशनच्या नवा धंदा मिळविणाऱ्या संघटनेला फार मेहनत घ्यावी लागणार आहे. त्यासाठी लोकांच्या उत्पन्नाच्या आटोक्यात येतील असे नवे विमा प्रकार शोधून काढण्याची, त्याचप्रमाणे विमेदाराला विमा चालू ठेवण्यासाठी अधिक सवलती देण्याची आवश्यकता आहे. नाहीतर वाढत्या महागाईमुळे अनेक विमापत्रके रद्द होण्याचे प्रमाण वाढीस लागेल, आणि कागदी प्रगती मात्र दिसेल.

---

## आशिआई डॉलर—एक नवे हिशेब चलन

काबूल येथे आशिआई अर्थमंत्र्यांची परिषद १६ डिसेंबर रोजी भरत आहे, तीमध्ये एक नवे आंतरराष्ट्रीय चलन—आशिआई डॉलर— सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल. ह्या चलनाची नाणी किंवा नोटा काढण्यात येणार नाहीत; फक्त हिशेबापुरताच त्याचा उपयोग केला जाईल. आशिआई राष्ट्रांची एक 'एशिअन क्लिअरिंग युनियन' स्थापन केली जाईल. आशिआतील राष्ट्रांची देणी-घेणी ह्या युनियनच्या द्वारा पुरी केली जातील. सध्या भारताला थायलंडच्या मालासाठी पैसे द्यावयाचे असतील, तर 'बाहट' हे थायलंडचे चलन ठराविक किमतीला विकत घ्यावे लागते आणि त्यासाठी चलन-विक्रेत्याला सुमारे १ टक्का कमिशन द्यावे लागते. जपानी मालासाठी अशाच रीतीने 'येन' खरीदावा लागतो आणि त्यासाठीही १ टक्का कमिशन द्यावे लागते. एशियन क्लिअरिंग युनियनच्या स्थापनेमुळे ०·७५% ची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. भारताचा आशिआई देशांशी वार्षिक १३५ कोटी रुपयांचा व्यापार चालतो. म्हणजे, युनियनमुळे भारताची दरसाल १ कोटी रुपयाच्या परदेशी हुंडणावळीची बचत होईल. युनियनच्या स्थापनेमुळे आशिआई रिझर्व्ह बँकेची स्थापनाही शक्य होईल.

---

### श्रोत्यांवरील रामन इफेक्ट

कै. डॉ. सी. व्ही. रामन ह्यांना १९३० साली रामन इफेक्टच्या संशोधनाबद्दल 'नोबेल पारितोषिक' मिळाल्यानंतर ते रंगूनला गेले होते. त्यांच्या सन्मानार्थ एक जाहीर सभा भरविण्यात आली होती. ते आपल्या भाषणात म्हणाले, "आपले तरुण आय. सी. एस. किंवा बॅरिस्टर होण्यासाठी किंवा आणखी काही पदवी मिळविण्यासाठी परदेशांत जातात. बहुतेकांना ह्यापैकी काहीच मिळत नाही. पण, कित्येकजण एलएल. डी. मात्र हटकून मिळवितात." ते काही वेळ स्तब्ध राहिले— हे कसे शक्य आहे, असे श्रोत्यांना साहजिकच वाटले. नंतर डॉ. रामन हसत हसत म्हणाले, "एलएल. डी. म्हणजे लॅंडलेडीज् डॉटर!" वास्तविक, "एलएल. डी." ही "डॉक्टर ऑफ लॉज" ह्या फार मोठ्या पदवीची अद्याक्षरे आहेत.

---

### जपानची स्पर्धा अमेरिकेला जाणवली

अमेरिकेच्या अर्थखात्याने जपानकडून आयात होणाऱ्या दूरचित्रवाणीच्या पड्यांबद्दल तक्रार केली आहे. खात्याच्या माहितीप्रमाणे जपान टेलिव्हिजनचे सेटस् त्यांच्या बाजारातील किंमतीपेक्षाही कमी किमतीने अमेरिकेत विकत आहे. जपान अमेरिकेला रंगीत व काळी-पांढरी चित्रे दाखविणारे लाखो सेटस् दरसाल निर्माण करीत असतो. आता हा प्रश्न टॅरीफ कमिशनपुढे ठेवण्यात आला असून जपानच्या स्पर्धेत अमेरिकेन टेलिव्हिजनच्या धंद्याला धोका पोचला आहे काय, ते ठरविण्यात येणार आहे. धोका पोचला आहे असे आढळल्यास जपानकडून येणाऱ्या टेलिव्हिजन सेटसूवर दंड घेण्यात येईल मग त्यांची किंमत अर्थातच वाढेल.

---

### मंत्र्यांचा खरा पगार स्पष्ट होऊ द्या!

आज मंत्र्यांचा पगार अवास्तव दिसत नाही, परंतु त्यांना फुकट मिळणारे अनेक फायदे, सुखसोई, करमुक्ती इत्यादींचा हिशेब केला तर त्यांना वास्तविक भरमसाट पगार मिळत आहे. हे जनतेला स्पष्ट व्हावे ह्यासाठी मध्यवर्ती मंत्र्यांना आज दरमहा ३७,५०० रुपयांचा मोबदला मिळत आहे तो त्यांना पगार रूपाने द्यावा आणि त्यांना इतरांप्रमाणे सर्व खर्च करायला लावावेत ह्यासाठी श्री. नानासाहेब दांडेकर ह्यांनी लोकसभेत एक बिल मांडले आहे.

---

### विदेशी बॅंकांतील ठेवींमधील वाढ

जुलै, १९६९ ते १३ नोव्हेंबर, १९७० ह्या काळात भारतामधील विदेशी बॅंकांकडील ठेवी १३·५% ने वाढल्या; सरकारी मालकीच्या बॅंकांकडील ठेवी २१% ने वाढल्या. ह्याचा अर्थ, सरकारी मालकीच्या बॅंकांकडे यावयाचा ठेवींचा ओघ विदेशी बॅंकांकडे वळलेला नाही. विदेशी बॅंकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा मानस नाही.

---

**लष्करातील अधिकाऱ्यांची भरती**—लष्करात १९६९-७० मध्ये भरती झालेल्या अधिकाऱ्यात उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि केरळ ह्या राज्यांतील अधिकारी सर्वांत अधिक होते. अधिकारी आणि जवान, दोन्हींच्याही भरतीत उत्तर प्रदेश अग्रेसर ठरला; गुजरात १७ राज्यांत सर्वांत खाली आहे.

**ठेवीदारांवर विम्याची सक्ती!**—बॅंकांतून ठेवी ठेवणाऱ्या सेव्हिंग्ज खातेदारांना आयुर्विमा सक्तीचा करण्याची योजना लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने आखली असून तीसंबंधी बॅंकांशी बोलणी चालू आहेत. वार्षिक ठेवीच्या रकमेइतकी त्या विम्याची रक्कम असावी, अशी सूचना आहे. बॅंकाकडून विम्याचा हप्ता वसूल केला जाईल. विमा मिळविण्याचा आणि कारभाराचा खर्च कमी झाल्यामुळे हप्ता लहानच राहील.

**मदतीच्या जिनसा चोरल्याबद्दल फटके**— पूर्व पाकिस्तानातील वादळग्रस्तांसाठी ठेवलेल्या जिनसांची चोरी केल्याबद्दल चितगावच्या लष्करी कोर्टाने दोघा जणांना १५ फटक्यांची शिक्षा सुनावली. ही शिक्षा सार्वजनिक ठिकाणी अमलात आणावयाची आहे. त्या दोघांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात येईल.

**स्टेट बॅंकेच्या चेअरमनची तक्रार**—"आपले हॉटेलवाले आणि दुकानदार परदेशी प्रवाशांकडून डॉलर किंवा पौंडातील चेक खुशीने स्वीकारतात, पण स्टेट बॅंक ऑफ इंडियावरील चेक स्वीकारण्यास तेवढे तयार नसतात" अशी तक्रार स्टेट बॅंकेचे चेअरमन श्री. आर. के. तलवार ह्यांनी आपल्या एका भाषणात केली.

**गांधी साहित्य वाळवीच्या भक्ष्यस्थानी**—महात्मा गांधींच्या साहित्याचे १२ खंड मराठीत प्रसिद्ध करण्यात आले त्यावर पब्लिक अकौंट्स कमिटीने कडक टीका केली आहे. एकूण ५८,०६० प्रती छापण्यात आल्या. दोन वेळा विक्रीच्या किंमती उतरवूनही फक्त ८,९३० प्रतींचा खप झाला. बाकीच्या प्रतींपैकी बहुतेक प्रती साठवणीच्या सोयीच्या अभावी वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. त्यामुळे सरकारी पैशाचा फार मोठा अपव्यय झाला आहे. १९५९ पासून १९६७ पर्यंत ग्रंथ समिती स्वतंत्र कारभार करीत होती. १९६७ मध्ये सरकारला फार उशिरा जाग आली.

**नोकरीसाठी ४० लक्ष बेकारांची नोंद**—नोकरी मिळण्यासाठी उद्योगविनिमय केंद्रात २१ ऑक्टोबर, १९७० रोजी नोंद असलेल्यांचे राज्यवार आकडे खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प. बंगाल | ५,५०,२५९; | उत्तर प्रदेश | ४,२१,९१६; |
| तामिळनाडू | ४,१०,८५२; | महाराष्ट्र | ३,२२,०२५; |
| बिहार | २,९७,३५५; | केरळ | २,७९,७१२; |
| आंध्र प्रदेश | २,७२,९१४; | म्हैसूर | २,३७,२४१; |
| मध्य प्रदेश | २,२५,४६०. | | |



# सहकारमंत्री श्री. यशवंतराव मोहिते

## व्यक्तित्वाची जडणघडण

ना. यशवंतराव मोहिते हे नुसते सहकार मंत्री नाहीत. त्या क्षेत्रातल्या नव्या दंडखोरीचे ते धुरिण आहेत. प्रवर्तक आहेत. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वातच गती-प्रगती आणि क्रांती आहे आणि म्हणून त्यांची 'श्वेतपत्रिका' प्रसिद्ध झाल्यावर सहकारी क्षेत्रातच नव्हे तर एकूण महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रातच एक प्रकारचे वादळ निर्माण झाले. ते वादळ शमले असेल वा नसेल. परंतु विचारांना गती देण्याचे, अंतर्मुख करण्याचे कार्य मात्र त्या श्वेतपत्रिकेने साधले आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

मोहित्यांचे घराणे तसे मूळचे पिढ्जिात श्रीमंताचे! श्रीमंतीही होती आणि शिक्षणही होते. त्यांचे वडील मॅट्रिक झालेले होते. त्या काळाच्या संदर्भात ही गोष्ट महत्त्वपूर्ण वाटावी. १९१० ला ते आपल्या शेतावरच्या घरात, झोपडीतच म्हटले पाहिजे, राहू‍ला गेले. त्याच शेतावरच्या घरात ७-११-२० ला यशवंतरावांचा जन्म झाला. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण आजोळी इस्लामपूर येथे झाले. पुढे कॉलेज शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले. इंटरच्या वर्गात असतानाच त्यांनी 'दास्यविमोचक सेना' काढली. त्या सेनेत १५०० गणवेषधारी माणसे होती हे सांगितले तर आश्चर्य वाटेल. त्या कार्यासाठी 'द्रष्टा' नावाचे एक वृत्तपत्रही ते चालवीत असत. श्री. नंजाप्पा यांची प्रशासक म्हणून कोल्हापूरला नियुक्ती झाली तेव्हा त्यांच्या 'नियुक्ती' विरुद्ध यशवंतरावांनी 'द्रष्टा' ह्या आपल्या पत्रात अग्रलेख लिहिला. त्या अग्रलेखाबाबत कोल्हापूर शासनाने त्यांच्याविरुद्ध पकडवॉरंट काढले. तेव्हा यशवंतराव भूमिगत झाले. त्यानंतर १९४२ च्या चळवळीचे वेळीही त्यांचा सक्रिय भाग त्यात असल्याने त्यांचे शिक्षण अपूर्णच राहिले.

वडील करारी होते. त्यांच्या घरी पाणी भरायलासुद्धा महारमांग असत. आणि त्यांची पंगत कधी वेगळी मांडली गेली नाही. १९११ सालची ही गोष्ट आहे. नुसते साल ध्यानी घेतले तरी त्या काळाच्या पार्श्वभूमीवर ह्या वागण्यातले मोठेपण, क्रांतिकारकत्व मनावर ठसावे.

समतेचे हे संस्कार यशवंतरावांनी घरातच घेतले. दारिद्र्याचा अनुभव घेत असतानाच हे दारिद्र्य कृत्रिम आहे, मानवनिर्मित आहे, परिस्थितीजन्य आहे याबद्दल त्यांची खात्री पटली. आणि त्यातूनच त्यांचा आजचा पिंड तयार झाला आहे. यशवंतरावांच्या वडिलांचे क्रांतिकारकत्व केवळ शिवा-शिवीपुरतेच मर्यादित नव्हते. शेतीविषयक अनेक नवीन प्रयोग त्यांनी केले. 'जॅक वेल'ची कल्पना १९११ साली त्यांनी कार्यान्वित केली ही एकच गोष्ट त्यांचे पुरोगामित्व सिद्ध करू शकेल.

मार्क्स इतकाच किंबहुना अधिक परिणाम थोर राजकीय विचारवंत व क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा झाला असे तेच सांगतात. रॉय यांच्या 'सायंटिफिक पॉलिटिक्स', 'बियॉन्ड कम्युनिझम' व 'रि-ओरिएंटेशन' ह्या तीन पुस्तकांचा फार खोल ठसा त्यांच्या व्यक्तित्वावर उमटलेला आहे. लोकशाहीतच डावी विचारसरणी बसविता येऊ शकते, त्यासाठी क्रांती हवीच असे नाही, या विचाराप्रत ते येऊन पोहचले आहेत. रॉयनी दाखविलेल्या मार्क्सवादाच्या उणीवा भरून काढण्याची गरज त्यांनाही पटलेली दिसते. आचार्य शं. द. जावडेकर यांच्या चिरंजीवांबरोबर इस्लामपुरला त्यांना आचार्यांचेही राजकीय विचार ऐकण्याची, पारखून घेण्याची संधी मिळाली. १९६० ते १९७० या काळात गृहखात्याच्या उपमंत्रिपदापासून ते 'सरकारमंत्री' पदापर्यंत त्यांनी झेप घेतली आहे.

क्रांतिप्रवणता व लोकशाहीनिष्ठा ह्या दोन्हींबाबत सुस्पष्ट कल्पना यशवंतरावांच्या जवळ आहेत. या जडणघडणीत आई-वडिलांप्रमाणेच पत्नीचाही वाटा मोठा आहे. डॉ. रामराव देशमुख यांची सुविद्य कन्या ही यशवंतरावांची पत्नी! पत्नीधर्म पाळणारी, नवऱ्याच्या मोठेपणाचा गौरव करणारी पण गैरफायदा करण्याचे स्वप्नही मनात न आणणारी! वादविवाद, भांडणे नाहीत. राजकीय चर्चा नाहीत. फारच कांही झाले तर वाचत बसण्याची यशवंतरावांची वृत्ती आहे. मुलांचा त्यांना फार लळा आहे. मुलांत रमणारा, मुलांसाठी ओढला जाणारा असा हा माणूस आहे.

(महाराष्ट्राचे सहकारमंत्री ना. यशवंतराव मोहिते यांनी दि. ७ नोव्हेंबर १९७० रोजी ५१ व्या वर्षांत पदार्पण केले. त्यानिमित्त त्यांच्या जीवनकार्याची माहिती देणारा डॉ. वा. बु. श्रीश्रीमाळ यांचा लेख 'दै. लोकसत्ते'त प्रसिद्ध झाला होता. त्यातील काही भाग)

## ब्रिटिश चित्रतारकांची संरक्षणाची मागणी

चित्रपटात चुंबन असावे किंवा नाही, नटयांच्या अंगोपांगांचे उघड प्रदर्शन कोणत्या पद्धतीने अगर किती प्रमाणात असावे इत्यादी गोष्टींबद्दल भारतात चर्चा चालू आहे. ह्या संदर्भात चित्रपटातील कलाहेतूबद्दलही "बरेच काही" लिहिले-बोलले जात आहे. ब्रिटन व इतर पाश्चात्य देश असल्या कोरड्या वादंगापासून बरेच दूर गेलेले आहेत. त्याचा परिणाम म्हणूनच की काय ब्रिटिश नटांच्या मध्यवर्ती संघटनेने चित्रपटातील उत्तान व मादक दृश्य टिपण्यात येत असताना त्यावर नजर ठेवण्यासाठी एक अधिकारी असावा अशी मागणी केली आहे. ही मागणी करण्यात कारणही तसेच घडले. १७ व्या शतकातील जोगिणींच्या रंगमोत्सुकतेचे दिग्दर्शन करणाऱ्या एका चित्रपटाचे चित्रीकरण चालू असता एक विलक्षण प्रकार घडला. लैंगिक दृष्ट्या उत्तान अशा दृश्यांचे चित्रीकरण सुरू होणार होते. ह्या दृश्यात भाग घेण्यासाठी ५ नटया तयार होऊन राहिल्या होत्या. आणि ५० पुरुष पाहुणे "कलाकार" ही सज्ज होते. दृश्यांचे चित्रीकरण सुरू होताच पाहुण्यांनी तयारीत असलेल्या ५ नटयांबरोबर बीभत्स स्वरूपाची वागणूक केली. सर्व पुरुष कलाकार नग्न होते. वास्तविक चित्रपटातील दृश्य म्हणून त्यांनी आपली वागणूक "नाटकी" ठेवावयास पाहिजे होती. पण तसे घडले नाही. सर्व ताळमेळ सोडून त्यांनी अक्षरशः नंगा नाच घातला. अर्थातच नटयांनी आपला तीव्र निषेध व्यक्त केला. अशा प्रकारच्या दृश्यांचे चित्रीकरण करताना नटयांशी गैरवाजवी लगट करता येऊ नये म्हणून एका निरीक्षकाची मागणी त्यांनी केली आहे.

---

## दाक्षिणात्य नटीने ओरिसा सरकारला बनविले

सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन ह्या संघटनेने ओरिसा सरकारला एका दाक्षिणात्य नटीने कसे बनविले ह्या संबंधीची माहिती उजेडात आणली आहे. त्याचे असे झाले, की ओरिसा सरकारच्या पाणीपुरवठा खात्याला काही यंत्रचलित नांगरांची जरूर होती. १९६७ साली राज्य सरकारने आंध्रमधील एका खाजगी कंपनीकडे परदेशी बनावटीच्या ट्रॅक्टर्ससाठी मागणी नोंदविली. लवकरच ह्या मालाच्या किमतीपैकी ९० टक्के रक्कम त्या कंपनीला देण्यातही आली. इतकेच नव्हे तर कंपनीने देऊ केलेल्या जामीनदारांची नुसती वरवर पाहणीही करण्यात आली नाही. पुढे असे झाले की कंपनी ओरिसा सरकारला एकही ट्रॅक्टर पुरवू शकली नाही आणि कंपनीला दिलेल्या आगाऊ किमतीपैकी एक पैसाही सरकारला वसूल करता आला नाही. आंध्रमधील कंपनीशी करण्यात आलेला हा व्यवहार एका दाक्षिणात्य नटीने घडवून आणला होता. ही नटी भुवनेश्वर येथे आली आणि सरळ सरकारच्या अतिथिगृहात उतरली. मुक्कामाची अशी सोय झाल्यावर तिने राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांच्या मनोरंजनार्थ कार्यक्रम सुरू केले. नंतर त्यांना छोट्यामोठ्या देणग्याही देण्यास सुरुवात केली. अपेक्षेप्रमाणे अधिकारी नटीच्या लाघवी वर्तनाने खुलत चालले. मग योग्य संधी साधून आणि मोक्याचे अधिकारी गाफील असल्याचे पाहून तिने ट्रॅक्टर्सच्या सौद्यावर शिक्कामोर्तब करून घेतले आणि भुवनेश्वरला रामराम ठोकला. त्या व्यवहारात ओरिसा सरकारला सुमारे २५ लाख रुपयांची ठोकर खावी लागली. युद्धकाळात एकमेकांची लष्करी गुपिते हस्तगत करण्यासाठी सौंदर्यशालिनी स्त्रियांची योजना करण्याची प्रथा प्राचीन आहे. त्यांचा उपयोग स्वदेशातील आर्थिक व्यवहारातही होऊ शकतो असे दिसते.

---

## जपानी स्त्रियांची रेशमी वस्त्रांची मागणी

किमोनो हा रेशमी झगा जपानच्या स्त्रियांचा अत्यंत आवडता आहे. अलीकडे जपानमधील स्त्रिया पाश्चात्य पद्धतीचा पोषाख अधिकाधिक करू लागल्या असल्या तरी बहुसंख्य स्त्रियांची आवड बदललेली नाही. म्हणूनच किमोनो वापरणाऱ्या जपानी स्त्रिया जगातील रेशमाच्या उत्पादनापैकी अर्धे-अधिक उत्पादन खरेदी करतात. त्यांची आवड अशीच राहिली तर १९८० च्या सुमारास जगातील सर्व रेशमी वस्त्रे त्या खरेदी करू लागतील. पाश्चात्य देशांतील स्त्रियांचा कल कृत्रिम धाग्याची वस्त्रे वापरण्याकडे अधिक आहे. जपानी स्त्रियांची आवड अशीच टिकून राहणे इष्ट आहे. त्या जर कृत्रिम धाग्याचे कपडे वापरू लागल्या तर जगातील रेशमाची बाजारपेठ मागणीचे अभावी कोसळून पडेल असा एका जपानी तज्ज्ञाचा अंदाज आहे.

---

## सुएझ कालवा बंद झाल्याने केळयांच्या निर्यातीवर परिणाम

१९६७ मध्ये अरब-इस्राइल युद्ध झाल्याने सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाला. त्याचा परिणाम म्हणून भारतामधून रशिआत पाठविण्यात येणारी केळीही पाठविणे बंद झाले. केळयांची रशिआला होणारी निर्यात बंद पडल्याने गेल्या तीन वर्षांत भारताला ३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाला मुकावे लागले आहे. भारतामधील केळी रशिआला काळ्या समुद्रावरील ओडेसा ह्या बंदराच्या मार्गाने धाडण्यात येत असत. १९६३ साली भारताने रशिआला 'बसराज' ह्या नावाने प्रसिद्ध असलेली केळी प्रथम निर्यात केली. ही केळी रशिआत फारच लोकप्रिय ठरली. अर्थातच त्यांची निर्यात वाढत्या प्रमाणात करण्यात येऊ लागली.

---

**मंदीचा कूपर इंजिनिअरिंगवर परिणाम—**कूपर इंजिनिअरिंगवर डीझेल इंजिनांच्या धंद्यातील मंदीचा खूपच परिणाम झाला. जून, १९७० असेरच्या वर्षी कूपरचा खप ३·९० कोटी रु. चा झाला; त्यापूर्वीच्या वर्षाचा खप ६·२५ कोटी रु. चा होता. त्यामुळे १०·७४ लक्ष रु. च्या नफ्याची जागा ३०·०६ लक्ष रु. तोटयाने घेतली.

## तरुणांच्या रक्तवाहिन्याही कठीण होऊ शकतात

वृद्धाव.था प्राप्त होण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास गेल्या काही वर्षांत जारीने चालू आहे. ह्या विषयीचे एक शास्त्रच ह्या अभ्यासाच्या योगाने बनले आहे. सामान्यतः असे मानले जाते की वृद्धत्व प्राप्त होण्याच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे रक्तवाहिन्यांना येणारे काठिण्य. रक्तवाहिन्यांची पोकळी जरेकडे झुकलेल्या माणसात कमी झालेली आढळून येते. तरुणात रक्तवाहिन्यांची अशा प्रकारची अकार्यक्षमता नसते असा समज आहे. पण अमेरिकेतील एका वैद्यकीय कॉलेजात काम करणाऱ्या डॉक्टरांनी ह्या समजुतीला धक्का दिला आहे. त्यांच्या मताने रक्तवाहिन्यांना होणारी ही विकृती तरुणांनाही होऊ शकते. डॉक्टर मजकुरांना अमेरिकेच्या वैमानिक दलातील मृत वैमानिक, अवकाशयान चालविणारे तंत्रज्ञ, इत्यादींचे शवच्छेदन करावे लागले होते. ह्या तपासणीत त्यांना असे आढळून आले की ३० वर्षे वयाच्या खाली असलेल्या ह्या तरुणांच्या हृदयाच्या रक्तवाहिन्याही कठीण झालेल्या होत्या. त्यातील एकाचे वय तर फक्त २० च होते. १९५२ साली झालेल्या कोरिआच्या युद्धात पडलेल्या अनेक तरुणांच्या देहाचे विच्छेदन त्यांना करावे लागले होते. त्यांपैकी बहुतेकांचे वय २२ च्या आसपासच होते आणि तरीही त्यांच्या हृदयाच्या रक्तवाहिन्यांची पोकळी भेदाने कमी झालेली आढळली. अमेरिकन तरुणांचा आहार ह्या गोष्टीला कारणीभूत असण्याची शक्यता आहे. प्रथिनयुक्त व कर्बयुक्त पदार्थांच्या अतिसेवनाने रक्तवाहिन्यांची ही विकृती होते असा समज आहे. अमेरिकेत लठ्ठपणा घालविण्यासाठी जे अनेक उपाय करण्यात येतात त्यावरून ह्या समजाला पुष्टीच मिळते.

---

## स्टॅलिनच्या युद्धकालीन चुकांची उजळणी

रशिआचे माजी पंतप्रधान मि. कुश्चाव्ह ह्यांनी सांगितलेल्या आठवणी सध्या लंडन टाइम्समध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहेत. त्यांनी मात्र अशा आठवणी सांगितल्याचे नाकबूल केले आहे. ह्या खऱ्या-खोट्या आठवणीत १९४२ मधील जर्मनीच्या रशिआवरील चढाईवर प्रतिचढाई करण्याचा हुकूम स्टॅलीनने दिला अशी एक आठवण आहे. ह्या प्रतिचढाईत रशिअन सेनेला प्रथम अनपेक्षित यश मिळाले आणि ती खारकॉव्ह शहराच्या दिशेने सरकू लागली. पण पुढे हा जर्मन लष्कराने आखलेला सापळा असावा अशी भीती मि. कुश्चाव्ह यांना वाटू लागली. त्या वेळी ते आघाडीवर होते. त्यांनी प्रतिचढाई मागे घेण्याचा सल्ला दिला. पण स्टॅलीनने तो मानला नाही. अखेर अडीच लाख रशिअन लष्कर जर्मनांनी नष्ट केले अगर बंदिवान केले.

---


तारेचा पत्ता: "मॉर्गेज" नी | दूरध्वनी | मुख्य कार्यालय: २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक: २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी: ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.
प्रादेशिक कचेरी: महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

**श्री. माधव आपटे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष**—श्री. माधव ल. आपटे ह्यांची महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी १९७०–७१ वर्षाकरिता निवड झाली आहे. ते ३९ वर्षांचे असून साखर, कापडाच्या गिरण्या, बका, इत्यादी धंद्यांत ते अग्रस्थानी आहेत. क्रिकेटपटू म्हणून ते सुप्रसिद्ध आहेत.

**मोडीच्या चणचणीचे कारण** — मुंबईमधील टांकसाळ दररोज २५ छोटी नाणी पाडीत असे. ती सध्या थायलँड आणि ग्रीस ह्या देशांच्या ऑर्डरी पार पाडण्यात गुंतली आहे. त्यामुळे बृहन्मुंबईत मोडीचा तुटवडा भासत आहे. 'बेस्ट' बसेसने दररोज सुमारे २० लक्ष उतारू प्रवास करतात, त्यांना दहा पैशांच्या नाण्याची गरज असते. दोन वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेने टांकसाळ अधिकाऱ्यांना कळविले होते, की छोटी नाणी भरपूर आहेत. आता त्यांचा तुटवडा पडल्याचे टांकसाळीला सांगण्यात आले असून तीन पाळ्या काम चालविण्याची सूचना देण्यात आली आहे. १५ जानेवारी, १९७१ नंतर परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा आहे.

**लॉटऱ्यांपासून १६·९० कोटी रु. मिळाले**—१९६९–७० मध्ये लॉटऱ्यांपासून सर्व राज्यांना मिळून १६·९० कोटी रु. ची प्राप्ती झाली. त्याची आकडेवारी अशी:महाराष्ट्र–४·४४ कोटी रु., तामिळ नाडू–३·२१ कोटी रु., पंजाब–२·१४ कोटी रु., हरयाणा–१·३९ कोटी रु. आणि उत्तर प्रदेश–१·०९ कोटी रु. लॉटरीतील पहिल्या बक्षिसाच्या रकमेची कमाल मर्यादा ठरविण्याचा विचार चालू आहे.

**कुटुंबनियोजनाचा मासिक प्रचार** — मध्यवर्ती सरकारच्या प्रत्येक नोकराला दरमहा पगाराबरोबर एक पाकीट मिळणार आहे. त्यात तीन ते सहा निरोधांचा आणि कुटुंबनियोजनविषयक माहितीपत्रकांचा समावेश असेल. सरकारी कचेऱ्यातील कॅन्टिन, क्लब, सायकल स्टँड, इत्यादी ठिकाणी कुटुंबनियोजनाचा संदेश देणारे पत्राचे फलक लावले जातील.

**इटलीत घटस्फोटांना मान्यता**—कॅथॉलिक धर्माला घटस्फोट मान्य नाही आणि कॅथॉलिक धर्मगुरूंचे वास्तव्य व्हॅटिकनमध्ये ( म्हणजे इटलीतच म्हणाना ) असते. इटलीमधील बहुसंख्य लोक कॅथॉलिक आहेत. इटलीच्या पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनी घटस्फोट कायदेशीर करणारे बिल ३१९ विरुद्ध २८६ अशा मतांनी नुकतेच मंजूर केले आहे.

**भूतकालीन अनिष्ट बाबी गाडून टाकल्या** — भूतकालीन अनिष्ट बाबी एका लाकडी शवपेटीत घालून ती पेटी मोठ्या समारंभाने जमिनीत गाडण्याचा कार्यक्रम सोमालिया देशाने पार पाडला. "वन्य जमातींच्या चालीरीती, लाचलुचपत, पैसेखाऊपणा, अन्याय आणि साम्राज्यवाद" हे शब्द त्या शवपेटीवर ठळकपणे लिहिले होते. "ज्या अनिष्ट बाबींनी आपणास शेकडो वर्षे मागसलेल्या स्थितीत राखले, त्या सर्व आपण आज गाडून टाकीत आहोत" असे ह्या समारंभाच्या वेळी सुप्रीम रेव्होल्यूशनरी कौन्सिलचे अध्यक्ष, मेजर-जनरल महमंद सेद बारा ह्यांनी जाहीर केले.




# कापसाच्या लागवडीचे क्षेत्र सर्वांत मोठे, पण दर एकरी उत्पादन सर्वांत कमी

## कापूस-शेतकऱ्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न

जगातील कापूस उत्पन्न करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, भारत, रशिया, इजिप्त, ब्राझिल इ. देश प्रमुख आहेत. त्यांपैकी भारताचे स्थान अमेरिका व रशिया सोडल्यास विशिष्ट आहे. कापसाच्या लागवडीखाली सुमारे ८ कोटी एकर जमीन जगाच्या विभिन्न देशात आहे व एकंदर कापसाचे उत्पादन ५ कोटी, ३५ लक्ष गाठी अंदाजे आहे. त्यांपैकी आपल्या देशात कापसाच्या लागवडीखालील क्षेत्र २ कोटी एकर असून सरासरी उत्पादन दर वर्षी ५८ ते ६० गाठींपर्यंत असते.

आपल्या देशातील कापसाच्या एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी सुमारे एक-तृतीयांश म्हणजे ६८ लक्ष एकर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. दर वर्षी महाराष्ट्र राज्यात कापसाचे सरासरी उत्पादन १६ ते १७ लक्ष गाठींपर्यंत होते. देशात होणाऱ्या एकंदर कापूस उत्पादनापैकी महाराष्ट्र राज्याच्या कापूस उत्पादनाची टक्केवारी २७ टक्केपर्यंत आहे.

महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांना रोख पैसे मिळवून देणारी पिके ऊस, कापूस व भुईमूग ही होत. ह्यामध्ये उसाची लागवड मोठ्या प्रमाणांत पश्चिम महाराष्ट्राच्या बागायती क्षेत्रामध्ये होत आहे. उसाचे किमान भाव केंद्र सरकारने ठरवून दिल्यामुळे व सहकारी तत्त्वावर उभारण्यात आलेले साखर कारखाने यशस्वी झाल्यामुळे उसाच्या किंमतीचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. कापसाच्या किंमतीचा प्रश्न सुटलेला नाही. राज्यात सहकारी तत्त्वावर एकंदर ९९ कपास प्रक्रिया संस्था स्थापन झाल्या असून त्यांपैकी ६४ प्रक्रिया संस्था कार्यान्वित झाल्या आहेत. परंतु कामाच्या अभावी व इतर कारणांमुळे कार्यान्वित झालेल्या ६४ प्रक्रिया संस्थांपैकी ४१ प्रक्रिया संस्था तोट्यात आहेत. एकंदर उत्पन्न होणाऱ्या कापसापैकी फक्त १५% कापूस सहकारी व्यवस्थेमार्फत विकण्यात येतो. म्हणूनच कापसाच्या विक्री व्यवस्थेमध्ये सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी बरेचसे प्रयत्न करणे आवश्यक आहे. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न म्हणजे (१) कापसाच्या दर एकरी उत्पादनात वाढ करणे, (२) उत्पादनाच्या वाढीसाठी चांगले बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके ह्यांची वेळेवर योग्य दरात मिळण्याची व्यवस्था असणे व (३) कापसाला रास्त भाव मिळणे हे होत. हे प्रश्न सोडविण्यासाठी योग्य उपाय योजनेची आवश्यकता आहे.

### प्रती एकरी उत्पादनात वाढ

राज्यातील कापसाची लागवड प्रामुख्याने जिराईत क्षेत्रात होत असते. राज्यात बागाईत क्षेत्राखालील लागवड फक्त ७ ते ८ टक्के आहे. कापसाचे बहुतांशी उत्पादन नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून आहे. देशातील कापसाचे प्रति एकरी उत्पादन १४४ ते ११५ पौंडापर्यंत आहे. त्या मानाने महाराष्ट्र राज्याचे सरासरी प्रति एकरी उत्पादन फक्त ६८ पौंड आहे. कापसाच्या दर एकरी उत्पादनामध्ये आपण किती मागे आहोत हे खालील तक्त्यावरून दिसते.

या दोन्ही तक्त्यावरून कापसाच्या प्रति एकरी उत्पादन वाढीसाठी किती वाव आहे तें स्पष्ट होते.

**महाराष्ट्रातील कापूस उत्पादन**

| राज्याचे नाव | लागवडीचे क्षेत्र (एकर) | एकंदर उत्पादन (गाठी) | प्रति एकरी उत्पादन |
|---|---|---|---|
| गुजराथ | ४१·५० लक्ष | १५·०० लक्ष | १६० पौंड |
| पंजाब | ९·५० लक्ष | ८·०० लक्ष | ३१४ पौंड |
| हरियाना | ५·२५ लक्ष | ३·५० लक्ष | २८० पौंड |
| मद्रास | १०·०० लक्ष | ४·५० लक्ष | १९७ पौंड |
| म्हैसूर | २४·५० लक्ष | ४·०० लक्ष | ७२ पौंड |
| मध्यप्रदेश | २०·०० लक्ष | ३·७५ लक्ष | ८८ पौंड |
| महाराष्ट्र | ६८·०० लक्ष | १६·०० लक्ष | ६८ पौंड |

**परदेशांतील कापसाचे उत्पादन**

| देश | लागवडीखालील क्षेत्र (हजार एकरमध्ये) | सरासरी उत्पादन (हजार गाठींमध्ये) | एकरी उत्पादन (पौंड हजारामध्ये) |
|---|---|---|---|
| रशिया | ६,०५४ | ९,५२० | ५५२ |
| अमेरिका | १०,१६० | ११,०६० | ५१६ |
| मेक्सिको | १,७८७ | २,४५० | ५६५ |
| इजिप्त | १,५२० | २,०१३ | ६३२ |
| ब्राझिल | ६,५०० | ३,३२० | २४४ |
| पेरु | ४३७ | ४७० | ४४६ |
| सुदान | १,२०५ | १,०५० | ४१७ |
| स्पेन | ३३७ | ३५५ | ५११ |
| सिरीया | ६५० | ७१० | ५२२ |
| भारत | २०,००० | ५,५०० | १२२ |

### उत्पादनवाढीसाठी आवश्यक वस्तूंचा पुरवठा

कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचा पुरवठा वेळेवर होणे आवश्यक आहे. कापसाच्या मागणीच्या गरजेप्रमाणे कापसाची प्रत सुधारणे महत्त्वाचे आहे. लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन कमी असल्यामुळे त्याच्या पूर्ततेसाठी प्रत्येक वर्षी परदेशी चलन खावे लागते, म्हणून लांब धाग्याच्या कापसाच्या उत्पादनासाठी संशोधनावर भर देऊन बियाणे उत्पन्न करणे फार आवश्यक आहे.

अनुभवाने असे सिद्ध झाले आहे की, कापसाच्या लागवडीच्या वेळी नायट्रोजन मिश्रीत रासायनिक खते वापरल्यास २०% ते

२५% पर्यंत उत्पादन वाढू शकते. त्याचप्रमाणे कीटकनाशक औषधांचा वापर केल्यास १५% ते २०% पर्यंत उत्पादनात वाढ होऊ शकते. म्हणून रासायनिक खते व कीटकनाशकांचा पुरवठा व त्यांच्या वापराची पद्धत शेतकऱ्यांना शिकविणे जरूरीचे आहे.

मात्र अशा रीतीने खते व कीटकनाशक औषधे वापरावयाची म्हणजे उत्पादनासाठी स्वाभाविकच जास्त खर्च होईल. सहकारी संस्थांतून खते व कीटकनाशकासाठी कर्जे द्यावयाची झाल्यास विक्रीच्या पैशातून त्या कर्जाची वसुली होण्याची शाश्वती पाहिजे. जोपर्यंत उत्पादकाला रास्त भाव मिळण्याची व्यवस्था होत नाही, तोपर्यंत कापूस पिकविणारे शेतकरी खतांचा, कीटकनाशकांचा जास्त प्रमाणांत वापर करणार नाहीत आणि उत्पादनात वाढ होणार नाही.

## कापसाच्या विक्रीची व्यवस्था

देशाच्या विभाजनानंतर उत्तम कापूस पिकविणारे दोन-पंचमांश क्षेत्र पाकिस्तानांत गेले, परंतु कापड उत्पादन करणाऱ्या गिरण्यांचा प्रदेश भारतात राहिला. त्यामुळे गिरण्यांना कापसाची टंचाई भासू लागली. कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठी केन्द्र सरकारने प्रोत्साहन दिले व त्यासाठी कापसाच्या किंमतीची किमान व कमाल भाव मर्यादा दर वर्षी निश्चित करण्यात आली. कापसाचे उत्पादन खपापेक्षा कमी असल्यामुळे व कच्च्या कापसाच्या किंमतीवर नियंत्रण नसल्याने शेतकऱ्यांना चांगले भाव मिळू लागले, म्हणून कापसाचे उत्पादन १९४७ मध्ये जे २२ लक्ष गाठी होते त्यात हळूहळू वाढ होऊन सन १९६८–६९ मध्ये ते ५८ ते ६० लक्ष गाठींपर्यंत वाढले. त्याचप्रमाणे कापसाच्या लागवडीखालील क्षेत्रसुद्धा १०७लक्ष एकरावरून २०० लक्ष एकरांपर्यंत गेले.

१९६७–६८ च्या सुरवातीस केंद्र सरकारने कापसाच्या किमतीची कमाल व किमान भाव मर्यादा रद्द केली व कापसाच्या प्रत्येक जातीसाठी आधारित भाव ठरविले. मात्र आधारित भाव ठरविताना कोणत्याही शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब करण्यात आला नाही. कापसाच्या प्रचलित असलेल्या किमान भावाच्या मर्यादेमध्ये थोड्या प्रमाणात वाढ करून तेच आधारित भाव ठरविण्यात आले. अशा प्रकारे ठरविण्यात आलेल्या आधारीत भावामुळे अर्थातच कापसाचे रास्त भाव मिळवून देण्याची शाश्वती निर्माण होत नाही. प्रत्येक वर्षी कापसाचे आधारित भाव ठरविण्यासाठी कापसाच्या उत्पादनाचा खर्च, जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती व इतर रोख पिकांची सापेक्ष भावाची तुलना यांची दखल घेण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या ह्या जिव्हाळ्याच्या मागणीवर लक्ष देण्यात आले नाही. ह्यामुळे १९६३–६४ पासून कापसाचे उत्पादनात व उत्पादन क्षेत्रात फारसा फरक पडला नाही. चौथ्या योजनेत कापसाच्या उत्पादनाचे लक्ष्य ८० लाख गांठींपर्यंत ठरविण्यात आले आहे. म्हणजे सध्याच्या उत्पादनात ३३% वाढ करण्याची गरज आहे.

## मध्यप्रदेश सरकारच्या योजनेला मदत नाकारली

मध्यप्रदेशातील चंबळ नदीच्या खोऱ्यातील घळींनी व्याप्त असलेला प्रदेश त्या राज्याची डोकेदुखी होऊन बसलेला आहे. ह्या प्रदेशाची व्याप्ती २.६३ लाख हेक्टरवर पसरलेली आहे. जमिनीची पावसापाण्याने होणारी धूप आणखी नव्या घळी तयार करत असते. अशा रीतीने दरसाल ८०० हेक्टर जमीन नापिकी व ओसाड होते. सोसाट्याचा वाराही ह्या प्रक्रियेला मदत करीत असतो. ह्या घळी कधीकधी १० फुटांपासून ३५ फुटांपर्यंत खोल गेलेल्या आढळतात. त्या भरून काढून ह्या प्रदेशाचे सपाट शेतजमिनीत रूपांतर करण्यात आले तर सुमारे एक लाख हेक्टर जमीन नव्याने लागवडीखाली आणता येईल. शिवाय, घळीत लपूनछपून राहणाऱ्या दरोडेखोरांचा बंदोबस्त होऊन त्यांचे पुनर्वसन करणेही सोपे होईल. हे काम करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारने ७३ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना आखली होती आणि तिच्या अमलबजावणीसाठी भारत सरकारतर्फे जागतीक बँकेकडे मदतीची मागणी केली होती. परंतु बँकेला ही योजना पसंत न पडल्याने तिने मदत देण्याचे नाकारले आहे. नानंजूर करण्यात आलेल्या योजनेऐवजी नवीन योजना तयार करावी आणि तीसाठी अमेरिकेच्या अॅग्रिकल्चरल रीफायनॅन्स कॉर्पोरेशनकडे मदत मागावी असे सुचविण्यात आले आहे. गेल्या वर्षी जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी संबधित प्रदेशाची पाहणी केली होती. दरम्यान ह्या प्रदेशाचा विकास करण्याच्या ४ छोट्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्यांपैकी एक योजना राज्य सरकारचे शेतकी खाते पार पाडीत आहे व दुसरी मध्यवर्ती सरकारतर्फे अमलात येत आहे.

## बिर्ला कंपनीला पश्चिम बंगाल सरकारची नोटीस

पश्चिम बंगाल सरकारने बिर्लाच्या हिंदुस्थान मोटर्स ह्या कंपनीला नोटीस पाठवून विचारणा केली आहे की तिच्या ताब्यात असलेल्या २०० एकर जागेचा ताबा सरकारने का घेऊ नये. कंपनीच्या ताब्यात असलेली ही जागा हुगळी जिल्ह्यात उत्तरपारा ह्या ठिकाणी आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी सरकारने ५०० एकरापेक्षा अधिक जमीन कंपनीला मिळवून दिलेली होती. उत्तरपारा येथील कंपनीच्या कारखान्याचा विस्तार करण्यास उपयोग व्हावा म्हणून कायदेशीर उपाय योजून कंपनीला वरील जमीन देण्यात आली होती. अलीकडे ह्या जागेची पाहणी करण्यात आली असता असे आढळून आले की एकूण जमिनीपैकी २०० एकरांपेक्षा जास्त जमिनीचा उपयोग करून न घेता कंपनीने ती नुसतीच पाडून ठेवली आहे. नोटीस बजावल्यापासून एक महिन्यात कंपनीने उत्तर द्यावयास हवे होते. अद्याप उत्तर आलेले नाही. नोटीस १२ नोव्हेंबर, १९७० ह्या दिवशी बजावण्यात आली आहे.

## सहांपेक्षा अधिक चित्रपटांत काम करण्यास बंदी

### नियमाची झळ कुणास लागेल ?

नट-नट्यांनी एकाच वेळी सहांपेक्षा जास्त चित्रपटांत कामे करण्याचे करार करता कामा नयेत, असे फिल्म प्रोड्यूसर्स गिल्ड ऑफ इंडिया, इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशन आणि सेंट्रल सर्किट सिने असोसिएशन ह्यांनी संयुक्तपणे ठरविले आहे. ज्या नट-नट्यांना ह्या नियमाची झळ लागणार आहे, त्यापैकी प्रमुखांची नावे खाली दिली असून त्यापुढील कंसात ते सध्या काम करीत असलेल्या चित्रपटांचा आकडा दिला आहे.

संजीव कुमार ( २२ ), जीतेंद्र ( २२ ), राजेश खन्ना ( २० ), नवीन निश्चल ( २० ), राखी ( १९ ), सायरा बानू ( १८ ), मुमताज ( १७ ), धर्मेंद्र ( १६ ), अजय सहानी ( १६ ), माला सिंहा ( १४ ), लीना चंदावरकर ( ११ ), साधना ( ९ ), आणि राजेंद्रकुमार ( ८ ).

---

## शेतीच्या उत्पन्नावर कर बसविण्याची सूचना


असोशिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेने देशातील आर्थिक परिस्थितीबाबत एक ठराव करून काही सूचना केल्या आहेत. ठरावात असे सुचविण्यात आले आहे की शेतीच्या उत्पन्नावर कर बसविण्यात यावा आणि नियंत्रित पद्धतीने तुटीचा अर्थभरणा करण्यात येऊन साधनसंपत्ती गोळा करण्यात यावी. ग्रामीण भागात भरमसाट पैसा पुरविण्यामुळे चलनवृद्धीला गती मिळेल असा इषाराही देण्यात आला आहे. राज्य सरकारांनी आपले आर्थिक व्यवहार करताना अधिक जबाबदारीने आणि शिस्तीने वागण्याची आवश्यकता स्पष्ट करण्यात आली आहे. सरकारच्या आर्थिक धोरणात बदल करून विकासावर असणारी बंधने रद्द करण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे. किमतीवर निवडक नियंत्रणे असावीत आणि राहणीच्या खर्चाचा व महागाईभत्त्याचा संबंध तोडून टाकावा अशी शिफारस करण्यात आली आहे.

---

## बंगलोर येथे दहनाची विजेची भट्टी

शवांचे दहन करण्यासाठी बंगलोर येथे विजेची भट्टी उभारण्यात आली आहे. एक शव दहन करण्यासाठी २५ रुपये आकारण्यात येणार आहेत. दक्षिण भारतात उभारण्यात आलेली ही पहिलीच दहनभट्टी असून भारतात चौथी आहे. ती उभारण्यासाठी बंगलोर कॉर्पोरेशनला ५·२ लाख रुपये खर्च आला आहे. भट्टी चालू करण्यात आली त्या दिवशी दहनासाठी आलेल्या पहिल्या तीन शवांना फुकट अग्नी देण्यात आला. दहनाची ही पद्धत लोकांना पसंत पडली तर आणखी एक भट्टी उभारण्यात येईल. दफनापेक्षा दहन अधिक सोयीचे आहे. अमेरिकेतील मोठ्या शहरांतून आता दफनासाठी जागा मिळणे दुरापास्त झाले आहे.

---


GADRE BROTHERS
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR [S. Rly.]
Phone : 318 *Sangli — Gram : "SEWA Madhavnagar



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्टे —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)